# प्रकरण २ रे

## मराठीतील अन्य आत्मकथनांची या काळातील असणारी

## परंपरा व स्वरूप

चरित्र हा एक महत्वाचा वाङ्:मय प्रकार आहे. ~~असे वाटते.~~ या अर्थाने की कथा, कादंबरी, नाटक, काव्य इ. वाङ्:मयप्रकार जितके महत्वाचे तितकाच हा वाङ्:मय प्रकार महत्वाचा आहे. किंबहुना इतर सर्व वाङ्:मय प्रकारांच्या संदर्भात "चरित्रा" चा विचार केला तर "चरित्र" हे प्रत्यक्षा/प्रत्यक्षपणे सर्वव्यापी असे आहे. उदा. "कादंबरी" मध्ये कथानक असते, म्हणजे त्यात व्यक्ती, प्रसंग आणि घटना असतात, घटनाही कोणाच्या तरी आयुष्यात घडलेली म्हणून त्या ~~म्हणून त्या~~ "कोणाला" किंवा व्यक्तीला त्यात प्राधान्य असते, शिवाय त्या घटना कार्यकारणापरत्वे विशिष्ट परिस्थितीत घडलेल्या असतात, व्यक्तींच्या कृतिउक्तीमागे ही त्या व्यक्तींचा "स्वभाव" असतो, म्हणून कादंबरीच्या कथानकात घटना, व्यक्ती, कृती, उक्ती, स्वभाव व प्रसंग इत्यादी घटक अंतर्भूत असतातच आणि या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून व संघटनेतूनच "कादंबरी"चे साहित्यरूप घडत असते. परंतु एका अर्थी कादंबरी व कादंबरीचे कथानक म्हणजे तद्ंगभूत व्यक्तींचे "चरित्र" च त्यात असते.

व्यक्तींचे चरित्र म्हणजे व्यक्तीची परिस्थितीसापेक्ष

कृतिउक्ती. म्हणून ज्या-ज्या वाङ्‌मयप्रकारात व्यक्तींच्या, कृति-उक्तींचे दर्शन असते, त्या वाङ्‌मयप्रकारात प्रत्यक्ष-प्रत्यक्षपणे "चरित्र" व्यापून असते, कथा, कादंबरी, नाटक इ. वाङ्‌मयप्रकारात विविध घटकांचे परस्पर संबंध व त्यांची संघटना जशी असते, त्यापेक्षा वेगळ्या प्रकारची संघटना "चरित्रात" असते, म्हणूनच "चरित्र" हा वेगळा व स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार मानला जातो.

## चरित्र आणि इतिहास -

एकंदर वाङ्‌मयाचे आपण शास्त्रीय वाङ्‌मय व ललित वाङ्‌मय असे वर्गीकरण करतो, कथा, कादंबरी, नाटक, काव्य, इत्यादींना आपण ललित वाङ्‌मय म्हणतो, आणि इतिहास, तत्वज्ञान इत्यादींना आपण ललितेतर वाङ्‌मय म्हणतो, ललित वाङ्‌मयात माणूस हाच साक्षात् प्रत्यक्षत: केंद्रबिंदू असतो, इतिहासात "माणूस" अप्रत्यक्षत: कुणलाही विवक्षित माणूस केंद्रवर्ती नसतो, इतिहास म्हणजे गतकालातील सार्वजनिक घटनांची पध्दतशीर नोंद आणि या सार्वजनिकतेमध्ये माणसांची विवक्षितता गौण असते, इतिहासात गतकाळातील सार्वजनिक घटनांची पध्दतशीर नोंद असते, "चरित्रात" सामान्यत: व्यक्तींच्या गतकाळातील वैयक्तिक जीवनातील घटनांची नोंद असते, म्हणजे "चरित्र" हा एका विवक्षित व्यक्तीचा इतिहासच असतो, स्थूलमानाने "चरित्र" हा वाङ्‌मयप्रकार वस्तुनिष्ठ स्वरूपाचा आहे. परंतु चरित्र नायकाविषयी आस्था आणि आत्मियता असेल आणि

त्या आत्मियतेनेच जर चरित्रकार लिहित असेल तर त्याच्या आत्मपरतेचा स्पर्श चरित्र विषयाला होणे शक्य व संभवनीय असते.

इतिहास आणि चरित्र यांचा एक अन्योन्य संबंध आहे. इतिहासात चरित्र असते, आणि चरित्रात इतिहास असतो. इतिहासात चरित्र असते, याचा अर्थ असा की, इतिहासकार राजकीय, सामाजिक, धार्मिक इत्यादी घटनांची कालक्रमानुसार नोंद करीत असतांना व्यापक अर्थाने विवक्षित कालाचेच अन्वर्थक चरित्र लिहित असतो आणि चरित्रकार एका व्यक्तीचे चरित्र लिहित असतांना त्या व्यक्तीचा इतिहासच लिहित असतो.

कार्लाईलने चरित्र आणि इतिहास यांची तुलना करतांना पुढील विधान केले आहे, ते असे की, "चरित्र म्हणजे एका व्यक्तीचा इतिहास आणि इतिहास म्हणजे अनेक व्यक्तींची चरित्रे होय. तसेच इतिहास म्हणजे थोर व्यक्तींचे चरित्र होय."

शेवटी एवढेच म्हणता येईल की, "चरित्र" हा नुसताच स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार आहे असे नव्हे तर ललितवाङ्‌मय व ललितेत्तर वाङ्‌मय यांच्या सीमा रेषेवरच असणारा हा वाङ्‌मय प्रकार आहे.

चरित्र आणि तत्वज्ञान -

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. चरित्र विषय आणि चरित्रकार जेंव्हा एकच असतो, तेंव्हा ते आत्मचरित्र होते. स्वत:च स्वत:चे चरित्र लिहावयाचे म्हणजे एक प्रकारे आत्मनिवेदन, आत्मप्रकटीकरण, आत्मकथन करण्यासारखे आहे. चरित्र हा वाङ्:मयप्रकार सामान्यत: वस्तुनिष्ठ आहे, तर आत्मचरित्र हा आत्मनिष्ठ आहे. आत्मनिवेदनाच्या प्रवृत्तीतून निर्माण झालेले बहुतांशी सर्व लेखन आत्मचरित्रात्मकच असते.

व्यक्तीच्या जीवनाचा, व्यक्तीत्वाचा व कर्तृत्वाचा त्याने स्वत:च लिहिलेला इतिहास म्हणजे आत्मचरित्र. "चरित्र" हा ही व्यक्तींचा इतिहास असतो. "आत्मचरित्र" हा ही इतिहास असतो. फरक एवढाच की, "आत्मचरित्र" कारच स्वत:चा इतिहासकार असतो, चरित्रकार असतो. "आत्मचरित्रात" लेखक स्वत:चाच वृत्तांत सांगतो. त्यामुळे स्वाभाविक त्यात इतरांचेही वृत्तांत येतात. आत्मनिरीक्षणा-प्रमाणेच गतकाळाच्या सिंहावलोकनाचा व सिंहावलोकित विश्लेषणाचा भाग आत्मचरित्रात असतो.

चरित्रकार चरित्रनायकाविषयी सत्यकथन करीत असतो, पण चरित्रकार खरोखरच संपूर्ण सत्यकथन करू शकतो का ? किंबहुना माणसाविषयी परिपूर्ण सत्य समजू शकेल काय ?

**Is it possible to know the truth about a man ?**
असा प्रश्न उपस्थित करून त्याचे नकारार्थी उत्तर आन्द्रेमोर्वानेच दिले आहे, पण त्याचा विश्वास असा आहे की, माणसाविषयीचे सत्य समजण्याची थोडीफार आशा "आत्मचरित्रात" आहे. कारण माणूस निदान स्वत:विषयी तरी खरं बोलू शकतो आणि याचअर्थाने डॉ. जॉन्सनच्या उक्तीचा नेहमी उल्लेख केला जातो. **"Every man's Life should be best written by himself".**

कारण प्रत्येक माणसाला स्वत:च्या जीवनातल्या घटना अचूकपणे माहित असतात.

"आत्मचरित्रात" चरित्राप्रमाणेच व्यक्तीच्या जीवनाचा, त्याच्या व्यक्तीत्वाचा, व्यक्तीमत्वाचा आणि जीवनकर्तृत्वाचा सत्यपूर्ण इतिहास असतो, चरित्रात तो दुसऱ्याने सांगितलेला असतो, "चरित्र आणि आत्मचरित्र ही जुळी भावंडे आहेत." असे रा.कृ. लागू यांनी म्हटले ते यथार्थ आहे, कारण चरित्रकार व आत्मचरित्रकार दोघेही "सत्यकथनाच्या बाबतीत समानधर्मी आहेत, "स्वत:च्या स्वाभाविक इतिहास कथन करणे". हेच आत्मचरित्रकाराचे ध्येयेदृष्ट असावे.

9

मराठी स्त्री-वाङ्मयाचा मागोवा घेण्यासाठी थेट सहाव्या-सातव्या शतकापर्यन्त मागे जावे लागते, या शतकात स्त्रियांच्या ओठावर खेळणाऱ्या ओवी-गाणी म्हणी-उखाणे वगैरे स्त्री वाङ्मयाचा उगम आढळतो, स्त्रीने आपली सुखदु:खे वरील माध्यमातून शब्दबध्द केलेली दिसतात.

जीवनातील नानाविध अनुभव ओव्यांचे विषय झालेले आहेत, लग्नानंतर माहेरची ओढ पुढील ओवीतून स्पष्ट होते.

उदा. "सरलं ग दळान माझं पायली पायली ।,

विसाव्याची जागा आई माजी ती मावली"

बरेचसे दळण एकावेळी दळून झाल्यावर झालेल्या श्रमांची जाणीव होवून आईची आठवण येते, सासरी "एक सासुरवाशीण" म्हणून कंठाव्या लागणाऱ्या जीवनात विश्रांती मिळणार नाही, याची तिला जाणीव असते, माहेरी जावेसे वाटते, पण घरात बोलण्याची सोय नसते, मग हृदयगत जात्याशिवाय कुणाजवळ सांगणार ? आपले सुखदु:ख सांगण्यास परंतु या कानाची गोष्ट त्या कानापर्यन्त न पोचविण्यास जाते हे एक फार मोठे साधन वाटते.

"ईश्वरा कोण्या डोंगरीचा ऋषी,

आई नी भणीवाणी हूरद उकलती तुजपाशी "

जात्याजवळ ती आपले मन मोकळे करते, जात्याच्या घरघरीतून तिच्या हृदगतात हुंकार मिळतो, ओवीमागून ओवी असे ओव्यांचे सर विणाते, सासरच्या तिखट अनुभवांना ओव्यात गुंफून आपले दाटलेले दु:ख ती हलके करते, ही सासुरवाशीण आपली परिस्थिती स्वत:शी आळवून म्हणते -

"सासर वस रवडा नको करंगा सासूबाई।

दारीच्या चाफ्याबाई दूर देशाची आली बाई।"

असे ती म्हणते, वेदनेमुळे नकळत पाणावलेले डोळे पदराने पुसते. ह्या ओवी वाड्:मयाचा जन्म विद्वत्तेतून झालेला नाही, तर उत्कट अनुभूतीतून झाल्याचे जाणवते.

ओवीनंतर "गाणे" हे माध्यम आत्मविष्कारासाठी उपयोगात आणल्याचे मराठी वाड्:मयाच्या इतिहासावरून कळते, ओवीपेक्षा गाण्याचा थाट अधिक पसरट आहे. साधारणपणे एखादा प्रसंग, एखादी घटना गाण्यात पूर्णपणे चित्रित झालेली दिसते.

ओवीप्रमाणेच सूत्रबद्ध असलेले म्हणी, उखाणे, ही माध्यमेही या कालखंडात आत्मविष्कारासाठी रूढ असल्याचे जाणवते.

"भाऊ भाऊ शेजारी भेट नाही संसारी"

दोन भावामधील रक्ताच्या नात्यातील वैमनस्य या म्हणीने अचूक टिपले आहे.

ओव्या, म्हणी, उखाणे हे वाड्:मय कागदावर लेखनात झाले नाही, पण वाणीवर खेळले, स्त्री हृदयावर कोरले गेले, व त्यामुळे विस्मृत न होता दंतकथाप्रमाणे वाणीवर खेळत-खेळत पिढ्यान्‌पिढ्या चालत आले.

"जसे सुचले तसे रचले,

आणि मग रूचले म्हणून हसले"

असे या वाङ्:मयाचे स्वरूप आहे आणि त्यातच त्याचे अक्षरत्व सामावलेले वाटते.

या प्राचीन स्त्री-साहित्यातील विश्व संकुचित आहे, कारण स्वत:चे कुटुंब, स्वत:चे गांव आपलीकडे स्त्रियांची नजर पोचत नव्हती, सासर माहेरच्या कुटुंबाचे भले व्हावे, यापेक्षा वेगळे आदर्श व ध्येयेही आत्मविष्कारासाठी जन्मलेल्या या वाङ्:मय-प्रकारात आढळतात.

उपलब्ध साहित्यावरुन शाके १२०८ च्या सुमारास आद्य मराठी कवियित्री महदायिसा हिने "धवले" म्हणजे लग्नसमारंभात गावयाची वरविषयक गाणी रचली. १३ व्या शतकात मुक्ताई जनाबाई व १५ व्या शतकातील बहिणाबाई या प्रमुख कवयित्री आपल्या काव्यरचनेने चमकल्या, अभंग हे त्यांच्या कवितेचे गाभ्यमक्र आहे, जवळ-जवळ सर्वच अभंग ईश्वरविषयक भक्तीतून जन्मलेले दिसतात, संत कवींच्या नंतर मराठेशाहीत पंतकवी व शाहीर उदयास आले. "वरिमर्दांचे" पोवाडे रचणे, हे स्त्रीच्या शक्तीबाहेरचे काम होते, या काळात स्त्रियांना सहज जमणारी ओवी, अभंग ही साधनेही मागे पडली, त्यामुळे मध्यंतरीच्या काळात स्त्रियांचा आवाज मराठी साहित्यात फारसा उमटलेला दिसत नाही.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने स्त्री लिहिती झाली, गिरीजाबाई केळकर, काशीबाई कानेटकर, आनंदीबाई शिर्के वगैरे स्त्रियांनी साध्या, सोप्या, गद्यमाध्यमातून निबंध, कथा, कादंबरी या स्वरूपात लेखन सुरु केले, सर्वसाधारणपणे ही स्त्री वाङ्‌मयाची परंपरा म्हणता येईल.

मराठी वाङ्‌मयात स्त्रीला ब-याच उशिरा प्रवेश मिळालेला दिसतो, आत्मचरित्र हा वाङ्‌मयप्रकार इतर वाङ्‌मयप्रकाराच्या तुलनेत साहित्यात विलंबाने नावारूपास आलेला आहे, त्यामुळे स्त्री आत्मचरित्राचा जन्मही उशिराच झालेला दिसून येतो, ६ व्या, ७ व्या शतकातील ओवी, गाणी, म्हणी, उखाणे यासारख्या स्त्री वाङ्‌मयातील आत्मविष्कारावरून ती आंशिक आत्मचरित्रे म्हणता येतील, आत्मचरित्र या वाङ्‌मयप्रकाराची कांही पाळेमुळे फक्त आपल्याला तेथे शोधता येतात, संत कवयित्री जनाबाई व बहिणाबाई यांचे अभंग हे सुध्दा विठ्ठलभक्ती पोटी लिहिलेले अभंग एवढाच त्यांचा संदर्भ होता, परंतु कळत-नकळत का होईना आलेल्या आत्मचरित्रपर उल्लेखावरून संत जनाबाई ही मराठीतील पहिली स्त्री आत्मचरित्रकार मानली जाते. जनाबाईच्या अभंगाकडे म्हणूनच की गततीने अथवा "उपहास" हे विनोदाचं शास्त्र म्हणून पहायलं जातं, त्याचा आढावा घ्यावासा वाटतो. वाक्यरचना !

उदा. जनाबाई म्हणाते विठोबाला -

अरे विठया अरे विठया। मूळ मायेच्या कारटया
तुझे गेले मढे। तुला पाहून काळ रडे.

अशा या "विठू" च्या गुन-गानात ती बेभानपणे रमत असली तरी आवश्यक त्या ठिकाणी ती स्वत:ला प्रकट करायला विसरत नाही.

"स्त्रियांचं दबलेलं हसू" विठ्ठलाच्या भोवती विणलेले तिचे हे लहानसे विश्व हेच तिचे आत्मचरित्र ठरते.

(१५ व्या शतकामध्ये बहिणाबाईंच्या अभंगातूनही त्यांचे आत्मचरित्र चित्रित झालेले दिसते.) यामध्ये आपल्या माहेरासंबंधी माहिती बहिणाबाईंनी दिली आहे, नव-याचे चांगुलपणा, स्वत:ला संतसहवासाची लागलेली तळमळ, वत्सप्रेम, तुकारामाच्या भेटीची आस, तुकारामाने स्वप्नात दिलेला गुरुमंत्र, तुकारामाच्या भेटीने झालेला आनंद, पतीचा राग, स्वत:च्या गोड वागणुकीने त्याच्या स्वभावात घडवून आणलेले परिवर्तन, पतीची सेवा करणे हाच आपला परमधर्म आहे, असे त्या मानतात, बहिणाबाईंच्या या वागणुकीने त्यांच्या नव-याला स्वत:च्या अविवेकी वागणुकीचा पश्चाताप होतो, सर्व विसरून जावून तेही बहिणाबाई बरोबर

तुकारामचरणी लीन होतात.

बहिणाबाईंनी आपल्या नव-यामध्ये घडवून आणलेल्या हृदयपरिवर्तनासंबंधी ल. रा. पांगारकर कौतुकाने म्हणतात, "सुशील व प्रेमी बायको नव-याचे स्वभावदोष मनात न आणता त्याला कशी ताळ्यावर आणते". याचे बहिणाबाई हे उत्कृष्ट उदाहरण आहे, शेवटी सद्गुरुमुळे जन्ममरणाच्या फे-यातून मिळालेली मुक्ती त्या आयुष्यातील छोटया-मोठया घटना प्रसंगाचा आधार घेवून बहिणाबाईने "स्व-प्रतिमा" ठळकपणे चित्रित केली आहे.

या आत्मचरित्रानंतर मराठी वाङ्:मयात १८ व्या शतका-पर्यन्त स्त्री आत्मचरित्र लिहिलेले दिसत नाही.

रमाबाई रानडयांनी आत्मचरित्र लिहिण्याची जी प्रथा सुरु केली, ती अधिक कलाकुसरीने लक्ष्मीबाईंनी पुढे चालविली, या वाङ्:मयप्रकारासंबंधी इतकी अवीट गोडी लक्ष्मीबाईंनी निर्माण केली की, आजतागायत ही परंपरा खंडीत न होता दिवसें-दिवस ती अधिकाअधिक समृध्द होत आहे, १९१० ते १९९४ या प्रस्तुत कालखंडात जी आत्मचरित्रे येतात, त्यांचा आढावा --

आमच्या आयुष्यातील कांही आठवणी - ऋमाबाई रानडे १९१०.

हे पुस्तक म्हणजे विसाव्या शतकातील सुरुवातीचे मराठी वाङ्:मयाचे सुंदर लेणे होय, यामध्ये रानडे मृत्यू पावल्यानंतर रमाबाईंनी त्यांच्या सहजीवनाच्या आठवणी लिहून काढल्या आहेत, एक अल्पशिक्षित परंतु बुद्धीमान स्त्री केवळ जिव्हाळ्याच्या बळावर आपल्या लेखनात केवढा गोडवा उत्पन्न करू शकते, याचे हे आत्मचरित्र हे उत्तम उदाहरण आहे, कौटुंबिक जीवनाचे चित्रण सरस झाले आहे.

स्मृती चित्रे - लक्ष्मीबाई टिळक - १९३४.

लक्ष्मीबाईंचे व्यक्तीमत्व स्वतंत्र व आपल्या पती इतकेच उठावदार दिसते, गृह जीवनाचे अत्यंत प्रामाणिक व स्मरणीय चित्र येथे पहावयास मिळते, कौटुंबिक जीवनाचे इतके सुंदर चित्र कदाचित जगाच्या वाङ्:मयातही पहावयास मिळणार नाही.

साधी, घरगुती, परंतु आकर्षक भाषाशैली मिळालेला विनोद स्पृहनीय, तटस्थवृत्ती व मनाचा मोकळेपणा या गुणांनी हे आत्मचरित्र नटलेले आहे.

आमची अकरा वर्षे : लीलाबाई पटवर्धन : १९५२.

माधवराव पटवर्धनासारख्या एका थोर विभूतीचे अगाध प्रेम

आपल्याला लाभल्याबद्दल लीलाबाईंना मन:पूर्वक धन्यता वाटलेली आहे, पण ही कृतार्थतेची भावना मनात सदैव बाळगलेली असूनही लीलाबाईंना माधवरावांच्या व्यक्तीमत्वाचे वस्तुनिष्ठ व यथार्थग्राग दर्शन घडविणे शक्य झाले आहे.

स्मृतितरंग : अन्नपूर्णाबाई रानडे : १९४७.

अन्नपूर्णाबाई व रानडयांची मित्रमंडळी यांचे रानडे हे आदराचे स्थान होते, त्यांच्यासाठी अन्नपूर्णाबाईंनी "स्मृतीतरंग" प्रकाशित केल्याचे त्या हृदगतात सांगतात, आपल्या आदरणीय आणि आदर्श पतीचे गुणगान बाईंनी केलेले आहे.

या सदाशिव : इंदिरा भागवत : १९४७.

या आत्मचरित्रात पतिनिष्ठा व तीचा गुणगौरव या गोष्टी समरस झालेल्या आहेत, ग्वाल्हेरचे एक कलावंत यादव सदाशिव भागवत उर्फ या सदाशिव यांच्या यशस्वी व्यावसायिक जीवनाचे त्यांच्या पत्नीने केलेले हे चित्रण अपूर्व असे आहे.

माझा नंदादीप - लक्ष्मीबाई पटवर्धन - १९५२.

पतीच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती अखंड तेवत रहाव्या या प्रेरणेतून लक्ष्मीबाईंनी हा "नंदादीप" लावलेला आहे.

वेचलेले मणी : राधाबाई केदार : १९५२.

केदारांच्या निधनानंतर व्यथित अंत:करणाला विरंगुळा मिळावा, म्हणून रमाबाईंनी हे आपल्या जीवनातील कांही "मणी" वेचलेले आहेत, आटोपशीरपणे स्पष्ट अशी प्रतिमा त्यांनी उभी केली आहे.

ढळला रे ढळला दिन सखया - "उमटलेली पावले"

राधाबाई आपटे : १९५८, १९६१.

आपटे गुरुजींची इच्छा आणि लोकाग्रह यातून जन्मलेले निधनापूर्वी आपटे गुरुजींच्या झालेल्या दीर्घ आजारावर राधाबाईंनी आपट्यांच्या अपु-या राहिलेल्या इच्छेनुसार "ढळला रे ढळला दिन सखया" लिहिले आहे.

आपट्यांच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाचे दर्शन "उमटलेली पावले" मध्ये घडते, आपट्यांनी राधाबाईंना सहधर्मचारिणी म्हणून दिलेला मान व आपट्यांच्या खांद्याला खांदा लावून राधाबाईंनी जीवनभर त्यांना दिलेली साथ हे या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ठ्य व वेगळेपणा होय.

मीच हे सांगितलं पाहिजे : शीलवती केतकर : १९६९.

केतकरासंबंधी असलेले गैरसमज दूर व्हावे, या हेतूने शीलवतीबाईंनी डॉ. केतकरांचे चरित्र लिहिले आहे, केतकरांचे व्यक्तीमत्व स्पष्ट करतांना आपले येतील. तेवढेच उल्लेख शीलवतीबाईंनी दिलेले आहेत, या आत्मचरित्रात पतीचे दोष निर्भिडपणे व दोष म्हणून सांगितले आहेत, "पाश्चात्य संस्कृतीचा" हा परिणाम असू शकेल.

माझे पुराण : आनंदीबाई कर्वे : १८४४.

हे आत्मचरित्र प्रांजळ आणि मनमोकळे आहे, अनाथ व गरीब मुलांना पोसण्याचे काम सोडून दिल्यास इतर सगळया व्यवहारात आपण पाहिलेला स्वार्थ आणि म. कर्वे सारख्या थोर पुरुषांची आपण पत्नी आहोत हा आपल्याला जडलेला अहंकार या आपल्या गुणादोषांची, मर्यादांची त्यांनी दिलेली कबुली ही त्यांच्या मनमोकळया वृत्तीची द्योतक आहे.

गेले ते दिवस - सत्यभामाबाई सुखात्मे - १९६५.

स्वतःची करमणूक व्हावी, दुसऱ्यांना आपल्या जीवनापासून कांही उपदेश द्यावा, जगासमोर यावे अशा स्ट हेतूनच जन्मलेली आहे.

स्मरणमाला : जानकी फडणीस : १९७०
---

पतीनिधनानंतर स्वत:च्या करमणूकीसाठी जानकीबाई फडणीस यांनी "स्मरणमाला" लिहिले, अवघ्या ७४ पानात जानकीबाईंनी गतजीवनाचा हा घेतलेला धावता आढावा म्हणता येईल.

अजुनी चालतेची वाट : आनंदीबाई विजापूरे : १९७२.
---

गणपतराव विजापु-यांच्या आणि बाईंच्या वयात असलेल्या अंतराने संसारात बाईंना वाटणारी असमाधानता बेह्रे-यांच्या नादी लागून शेवटी पदरात पडलेला प्रेमभंग, सर्वांची मने मोडून वाट्याला आलेले परित्यक्त जीवन या सर्वाचे प्रत्ययकारी दर्शन येथे घडते.

"आंब्याचा टाळा ": सई आठवले : १९७४.
---

सुशिलाबाई आठवले खूप दिवस अंथरूणाला खिळून होत्या, अंथरूणावर पडून-पडून कंटाळा येई, तेंव्हा करमणूक व्हावी, म्हणून त्यांनी आत्मचरित्र लिहिले, हे आत्मचरित्र गद्यपद्यात्मक आहे, हेच याचे वेगळेपणा होय.

दुर्दैवाशी दोन हात - सरोजिनी सारंगपाणी - १९७५.
---

जवळ असलेल्या तुटपुंज्या पैशातून लहान बाळाचे दूध की नव-याची सिगरेट ? ह्या निर्माण होणा-या प्रश्नावरून त्यांच्या दुर्दैवाची कल्पना येते, अगदी शेवटपर्यन्त बाईंना असाच दुर्दैवी

सामना करावा लागलेला आहे.

पानाआडचे फूल : आशालता सावे : १९७५.

"पानाआड दडलेले फुल" लोकांच्या दृष्टीस आणण्याचा हा प्रयत्न आहे, त्यासाठी "पत्र" हे माध्यम वापरलेले आहे, पत्ररूपाने लिहिलेले हे मराठीतील पहिले आत्मचरित्र होय. पत्रात माणूस मोकळा होतो, तशाच आशाबाईही उकलत जातात.

आमचा जीवनप्रवास : यशोदाबाई जोशी : १९४७.

[प्रकाशन १९६५]

जुन्या पिढीतील नेमस्त पुढारी कै. सर मोरोपंत जोशी यांच्या पत्नी यशोदाबाई जोशी यांनी जे आत्मचरित्र लिहिले, यामध्ये पती-पत्नीच्या सुमारे ७५ वर्षांच्या सहजीवनाचे चित्र रेखाटले आहे, १८६१ ते १९४७ या काळातील बदलत्या राजकीय, सामाजिक, कौटुंबिक परिस्थितीचा आलेख येथे पहावयास मिळतो.

आमचे कृतार्थ सहजीवन : रुथ हिवाळे -

या आत्मचरित्रात डॉ. हिवाळे व रुथबाई यांच्या प्रतिमा उत्कृष्टपणे चित्रित झालेल्या आहेत, त्याचबरोबर अमेरिकन जीवनाची ओळखही यातून होते, अमेरिकेत घालविलेल्या दिवसांचे फार सुंदर चित्र त्यांनी रेखाटले आहे.

स्मरणासाखळी : कमलाबाई देशपांडे : १९५९.

सुंदर भाषाशैली व शब्दचित्रे यांनी नटलेले हे आत्मचरित्र आहे, याचा पूर्वभाग काव्यमय असून अत्यंत चित्तवेधक आहे, पण पुढील काळात हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेचे कार्य करीत असतांना त्यांना जे कटू अनुभव आले, त्यांचे वर्णन करतांना कमलाबाईंचा तोल सुटल्यासारखा झाला आहे, आत्मसमर्थन वृत्तीचा अतिरेक झाला आहे, त्यामुळे या भागास कडवट चव आली आहे, साक्षरतेची अत्युच्च परिसीमा गाठलेल्या एका विदुषीच्या आत्मचरित्रात हे अपेक्षित नव्हते.

गोदातरंग : सुधा अत्रे : १९६९.

शिक्षण क्षेत्र हा बाईंचा आवडता प्रांत. यातच त्यांचे सर्व आयुष्य गेले, अत्र्यांसारख्या रसिक माणसाबरोबर संसार होवूनही त्यांची शिक्षण प्रांतातील व्यक्तीरेखाच अधिक भरीव वाटते.

चाकोरीबाहेर : गंगुबाई पटवर्धन

एकूणच आत्मचरित्रकार स्त्रियांपैकी गंगुबाई पटवर्धन ह्या एकमेव चाकोरीबाहेरचे सर्वसामान्य स्त्रीला न रुचणारे, पेलणारे असे नैष्ठिक ब्रम्हचा-याचे जीवन जगल्या आहेत. आपल्या लेखन हेतूसंबंधी त्या सांगतात, " - - - - - - मी स्विकारला तो जीवनाचा मार्ग मी का स्विकारावा व तो कसा पार पडला ? हे जाहीरपणेच सांगून टाकावे, म्हणजे नुसते वर्तकुतर्क करण्यास वाव मिळणार नाही, "चाकोरीबाहेर" ची अशी सुरुवात झाली [पान ८]

माझी कहाणी : पार्वतीबाई आठवले - १९२८.

एक दुर्दैवी विधवा, अशिक्षित स्त्री योग्य संधी मिळताच केवढी गौरवास्पद कर्तबगारी दाखवू शकते, याचे पार्वतीबाई म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. वयाच्या ४०व्या वर्षी इंग्रजी मुळीच येत नसतांना अमेरिकेला जावून तेथे मोलकरणीची कामे करून तेथेच इंग्रजी शिकते, या ध्येयवादी व महत्वाकांक्षी स्त्रीने कन्यांच्या संस्थेकरता पैसा आणलेला आहे.

त्या करारीही आहेत. त्यांच्या मनात प्रस्थापित जुन्या-नव्याचा मिलाप आहे. बाल विवाह नको तसा प्रेमविवाहही नको, असे त्यांचे मत आहे. एकंदरीत पार्वतीबाईंचे लिहिणे साधे,सरळ व रोखठोक, आत्मविश्वास प्रकट करणारे आहे.

निशिगंध : मृणालिनी देसाई - १९६८.

लहानपणापासून त्या देशसेवेने भारलेल्या दिसतात, त्यासाठी १९४२ च्या स्वातंत्र्यलढयात भाग घेतात, त्या चळवळीत आलेले अनुभव, जीवनाचे एवढेच अंग निवेदन करणे ही या आत्मवृत्तामागील प्रेरणा आहे.

जेंव्हा माणूस जागा होतो : गोदावरी परुळेकर - १९७०.

आदिवासींसाठी केलेल्या कामाचे अनुभव लिहावे अशी परुळेकरांची इच्छा होती, हीच या लेखनामागील प्रमुख प्रेरणा होय. ठाणे जिल्ह्यातील आदीवासी जमातीचे जीवन त्या जवळूनच न्याहाळतात, या निरीक्षणातून सर्वांची व आपली जात "माणूस" ही एकच असल्याचे त्यांना जाणवते आणि माणुसकीने त्या गहिवरून येतात, या जमातीतील माणसातला माणूस जागा करणे हे त्यांचे ध्येय बनते, आपले ध्येय साध्य करण्यासाठी रहाव्या लागणाऱ्या वातावरणातून, त्यांच्या कार्यातून प्रतीत होणारी बाईंची प्रतिमा "जेंव्हा माणूस जागा होतो" मध्ये मिळते.

"पण ऐकतं कोण ?" - उषा डांगे - १९७०.

कामगारांच्या संपाच्या, चळवळींच्या लढयांच्या हकिकती सांगता-सांगता उषाबाईंनी "स्व" चित्र रेखाटले आहे, त्या स्वत: यासंबंधी सांगतात, "खरं म्हणाल तर ही कहाणी माझी स्वत:ची अशी कमीच, कामगार लढे, जनतेचे संग्राम, पार्टी, डांगे व त्यांचे सहकारी यांचे कार्य व नोंद यांत नसती तर केवळ मी कुठे असते ? असा प्रश्न येवू शकतो, पण मी तरी त्यापासून अलग कोठे होते ? आणि कशी रहाणार ? संपाच्या, चळवळींच्या हकिकती अतिशय मनोरंजक वाटतात.

"हे गीत जीवनाचे " - सुमती शहा - १९७१.

सर्वसामान्य माणसाला हवी असणारी सर्व सुखे हात जोडून समोर उभी असतांना त्या सर्वांना लाथाडून त्यांनी आपले जीवन दीनदुबळ्या व परित्यक्ता स्त्रियांच्या भल्यासाठी वेचले, हाच त्यांच्या जीवनातील अमोल त्याग होय.

"अश्वत्थाची फुले" - प्रमिला भालेराव - १९७२.

लेखन हेतूचा खुलासा प्रमिलाबाई आपल्या पत्रात करतात. "त्या मागच्या गोष्टी मुलांना सांगतांना मुले म्हणातात -

" हे सर्व लिहून ठेव, मजा वाटेल वाचतांना" पूर्वीच्या वातावरणाचे वर्णन मुलांसाठी व माझी आवड म्हणून लिहून ठेवले". [पृ. १६०]
आपल्या व्यवसायातील विविध अनुभव सांगून त्यांनी "स्व" प्रतिमा रेखाटली आहे, या आत्मचरित्रात उमटलेले तत्कालीन मराठवाड्याचे जीवंत चित्र हे या आत्मचरित्राचे वैशिष्ठ होय. जी/ष्ट्य

"जाऊ मी सिनेमात ? " शांता आपटे - १९४०.

चित्रपटसृष्टी हे कार्यक्षेत्र, या क्षेत्रातील आपले अनुभव दिले आहेत, सिनेमात जाण्यासाठी मार्गदर्शन व्हावे, म्हणून त्यांना अनेक पत्रे येत, या सर्व ज्यांना उत्तर म्हणून शांताबाईंनी या सृष्टीचे खरे रूप दाखविले, तिचा वरचा मुखवटा काढून टाकला व मूळ चेहरा, निदर्शनास आणला, माणुसकीच्या गहिवरातून त्यांनी चित्रपट सृष्टीतील दिखाऊ, खोटया, फसव्या, बेगडी जागा जगाला उलगडून दाखविल्या आहेत, भोळया जीवांच्या जीवनाचे वाटोळे होवू नये, ही त्यांची मनिषा आहे.
हे चित्रपटसृष्टीचे खरे स्वरूप समजावून घेवून नंतर सिनेमात जाण्याचा विचार करावा, असे त्या स्वानुभवातून सांगतात.

माझी नृत्यसाधना - रोहिणी भाटे - १९५०.

नृत्य हेच त्यांचे ध्येय, ध्येयपूर्तीतून आलेल्या अनुभवांचे हे चित्रण आहे, नृत्य या ध्येय प्राप्तीसाठी अविरत परिश्रम

घेणा-या, स्वत:चे दोष प्रांजळपणे कबूल करणा-या, गुरुंचे ऋण कृतज्ञतेने मान्य करणा-या नृत्यकलेचे महत्व व तिच्यापासून मिळणारा आनंद विशद करुन सांगणा-या रोहिणीबाई दिसतात. नृत्यकलेसंबंधी गैरसमज पुसण्याचे काम त्यांनी केले आहे.

स्वरवंदना : ज्योत्स्ना भोळे - १९७०.
---

शैलजाबाई राजे यांना ज्योत्स्ना भोळे यांचा अभिनय आणि गाणे फार आवडे, या आवडीतून त्यांचा परिचय करुन घेण्याची उत्सुकता त्यांना होती, या आवडीतूनच हे आत्मचरित्र जन्मले, रूढ प्रेरणांपेक्षा अशी वेगळी प्रेरणा या आत्मचरित्रामागे आहे, शैलजाबाई राजे यांनी जरी लेखन केले असले तरी त्यांनी ज्योत्स्नाबाईंना पूर्णपणे उभे केलेले आहे, उत्कृष्ट कलाकार आणि उत्तम गृहिणी अशा दोन्ही भूमिका एकाचवेळी साधणा-या प्रस्तुत कालखंडातील स्त्रियांमध्ये ज्योत्स्नाबाई एकमेव वाटतात.

सांगत्ये ऐका : हंसा वाडकर
---

तीस वर्षे ज्या सिनेसृष्टीची निष्ठेने सेवा केली तिचे बाह्यस्म अत्यंत देखणे व आकर्षक वाटत असले तरी ते फसवे आहे, चकवणारे आहे, हे लोकांना पटवून देण्यासाठी हंसाबाईंनी स्वत:ला आलेल्या अनुभवाचे सूक्ष्म निरीक्षण करुन "स्व" प्रतिमा

रेखाटलेली आढळते, एक यशस्वी कलाकार, पण अयशस्वी गृहिणी आणि मुख्यत: "माणूस" या नात्याने दिलेल्या सिनेक्षेत्रातील धोक्याच्या सूचना अशी हंसाबाईंची प्रतिमा "सांगत्ये ऐका" मधून मिळते.

स्नेहांकिता - स्नेहप्रभा प्रधान - : १९७३.

जगावेगळे जीवन त्यांच्या वाटयाला आलेले आहे, ठिकठिकाणी असमाधानी राहिलेले मन तृप्तीसाठी सतत धडपडतांना दिसते, अशावेळी लाभलेले "डॉकचे प्रेम" त्यांच्या जीवनातील सर्वस्व होवून बसते, डॉकच्या मृत्यूनंतर त्या पुन्हा एकटयाच पडतात, त्यांच्या आणि डॉकच्या मैत्रीसंबंधी अनेक तर्ककुतर्क केले जातात, आपले आणि डॉकचे संबंध स्पष्ट करण्यासाठी त्यांनी "स्नेहांकिता" लिहिले, स्नेहप्रभा प्रधान निर्मळपणाने शिरोडकरामध्ये गुंतून जातात, पण शिरोडकरांचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन प्रधानाइतका स्वच्छ वाटत नाही. ते एक बाई म्हणूनच त्यांच्याकडे पाहतात.

द्रौपदीची थाळी : गिरीजा केळकर - १९५९.

५३ वर्षे ज्या देवाच्या सहवासात गेली त्या, स्वाभाविकपणे या ग्रंथांत महत्वाचे स्थान मिळाले आहे, कारण तो देव गेल्याने

देव्हारा सुना पडला, असल्याचे लेखिका सांगते, मात्र लेखिकेने स्वत:कडे मोठा स्थान घेतलेले नाही, मराठी साहित्यात स्वत:चे असे स्वतंत्र स्थान प्रस्थापित केलेले होते, शिवाय या ग्रंथात एक कर्तव्यदक्ष व कर्तबगार गृहिणी या नात्याने यांचे अस्तित्वच प्रकर्षाने उठून दिसते.

सांजवात : आनंदीबाई शिर्के : १९७२.

आपला लेखनहेतू आनंदीबाई स्पष्ट करतात, "मी आत्मचरित्र लिहिले ते माझ्या मुलासाठी त्यांना आपली आई कशी होती ? हे कळावे हा हेतू "आनंदीबाई शिर्के यांचे पत्र परिशिष्ट.

आनंदीबाईंनी जसे पहले तसे सरळ साधेपणाने लिहिले आहे.

माझ्या जल्माची चित्तरकथा - कांबळे मास्तर -

शांताबाई कांबळे - १९८६.

१९८१ हा काळ दलित लेखनाच्या विशेषत: हा आत्मवृत्तांच्या चर्चेचा काळ मग जेंव्हा दलित स्त्री लिहिलं, तेंव्हा १
ती कशी लिहिलं ? दलित स्त्रीचं लेखन फार आगळंवेगळं

असेल, त्या काळात [१९८२-८३] दलित महिलेची दुसरी आत्मकथाच प्रसिध्द झाली नव्हती, पहिलटकरणीचा मान शांताबाईंचाच. आयुष्यात प्रथमच शिक्षणाची संधी मिळालेल्या दलित महिलेच्या संघर्षमय जीवनाची कहाणी आहे, त्यांचे हे आत्मचरित्र हा स्त्रीमुक्ती लढयातील एक अध्यायच समजावा लागेल.

या आत्मकथनामध्ये शंकरराव खरात यांच्या मातोश्री साऊबाई, त्यांचे घर, त्यांचे कुटुंब यांच्याशी निगडीत असा भाग आलेला आहे, आपल्याही जीवनात अशा त-हेच्या घटना आलेल्या आहेत. असे लेखिकेला वाटू लागले, जीवनपट डोळयासमोरुन सरकू लागला आणि त्यांनी झपाटयाने हे आत्मचरित्र लिहिले.

मिटलेली कवाडे : मुक्ता सर्वगोड "मी" दुर्गा खोटे

"जिणं आमचं" - बेबी कांबळे.

या आत्मवृत्तातही दलित जीवनाचा अंत:पट रेखाटला आहे, दलित स्त्रीचे जीवन म्हणजे दलितामधील दलित-गुलामांची गुलाम. या जीवनांच्या वाचनाने भारतीय स्त्रीची गुलामी दूर होण्यास मदत होईल.

मला उद्‌वस्त व्हायचंय - शेख मल्लिका अमर - १९८४.

"मला उद्‌वस्त व्हायचंय" ची लेखिका स्वार्थाने आत्मकथन मुक्कामावर आलेली नसतांना ऐन तरुण वयातच पस्तीशीतच आत्मकथन करते, तेंव्हा गंभीर आणि तटस्थपणे आत्मशोध करण्यापेक्षा ताज्या-ताज्या घटनातून अजून बाहेर न आल्याने आवेशाने आणि आवेगाने मांडलेली कैफियत असे तिच्या लेखनाचे स्वरूप झाले आहे.

शाहीर अमर शेख या उमदया आणि कलंदर कलावंताची मुलगी. मल्लिकाची आई अत्यंत देखणी, पागरे प्रभू जातीची। त्या काळात घर सोडून प्रेमविवाह केलेला. कुसुम जयकर उर्फ मैनेखी त्यामुळे समृध्द, उदारमतवादी, चळवळीच्या वातावरणातल्या घरात मल्लीकाचे बालपण गेले, अशात कोवळया शाळकरी वयातच मल्लिका आपला मेहुणा अच्युत बर्वे याचा कलंदर कवीमित्र नामदेव ढसाळ याच्याकडे आकर्षित झाली, आणि त्याच्या देखण्या, आवेगी व्यक्तीमत्वाने भारावून गेली, त्याचे दलित असणे, त्याची आर्थिक विपन्नावस्था असणे, त्याचे बेबंद दारूचे व्यसन आणि रूढ मध्यमवर्गीय सुशिक्षित चाकोरीला कल्पनाही करता येणार नाही, अशा अनुभवांनी भरलेले जीवन यापैकी कशा-कशाचीही विचार न करता हट्टाने कायदयाने

विवाहाचे वय होण्यापूर्वीच विवाह करुन मोकळी झाली, आणि त्यानंतर जे-जे घडत गेले, त्याची कैफियत म्हणजे आत्मकथन मला उद्ध्वस्त व्हायचंय.

नाच ग घुमा : माधवी देसाई - १९८८.

माधवी देसाई यांच्या आत्मकथनापासून स्त्रियांच्या आत्मकथन क्षेत्रात एक नवे पर्व सुरु झाले, यामध्ये माधवीताईंचा जीवनक्रम थोडा वेगळ्या वाटेने गेला, कलावती आईच्या पोटी जन्माला आलेली मुलगी, आजीच्या मायेखालीच वाढली, आणि गोव्यात लग्न होवून गेली, त्यानंतर समजंस पतीच्या जोडीत स्वतंत्र संसार करण्याच्या ओढीने मुंबईला गेली आणि चारचौघीसारखा नेकीने संसार करु लागली, तीन मुलींची आई झाली आणि सवंगडी अर्धा डाव टाकून थोडया आजाराचे निमित्त होवून गेला, तरीही पुन्हा लग्न झाल्यावर घेतलेल्या शिक्षणाच्या आधारावर नोकरी करुन ती संसार करु लागली.

आणि अशातच रणजित देसाईसारखा प्रसिध्दीच्या शिखरावर असलेला कलंदर, घरंदाज पुरुष आयुष्यात आला, तो ही विवाहित, दोन मुलींचा बाप, पत्नीपासून विभक्त झालेला, दोघांनी प्रौढ वयात विवाह केला आणि पुढची सगळी कहाणी शोकांतिका ठरत गेली, सुरवातीपासूनच

आधीच्या मुली [दोघांच्याही] घरातले तथाकथित खानदानी वातावरण यात ओढाताण सुरु झाली असली तरी नव-याचा आधार आहे, हा विश्वास प्रारंभी होता, खरे तर बाईंना वास्तवाचे भान लवकर आले नाही, लेखकाच्या कादंबरीतील [स्वामी] नायिका आपण आहोत, या स्वप्न रंजनात त्या रंगल्या आणि त्यापुढे नायिका रमेसारखीच जीवंतपणी लोकापवाद. आणि मन:स्तापाचे चटके सोशीत सतीची सत्वपरीक्षा द्यावी लागली.

माधवीताईंच्या सर्व कथनामध्ये आधुनिक व्यक्तीस्वातंत्र्यवादी, आत्मनिष्ठ स्त्रीजीवन आणि सरंजामशाही मूल्ये यांची सतत ओढाताण दिसते.

आहे मनोहर तरी - सुनिता देशपांडे - १९९०.

"आहे मनोहर तरी - - - - - - -" ची आजवर जी खंत झाली त्यात बराचसा भर "भाई" च्या संदर्भातल्या घटनाप्रसंगाशी संबधित भागावर आहे, इतर विशेषत: विवाहपूर्व प्रसंग दुर्लक्षिले गेले आहेत.

विवाहसंस्था ही एक कृत्रिम व्यवस्था आहे, त्यामुळे सुरुवातीची ओढ कमी झाली की, अतिपरिचयात अवज्ञा अटळ ठरत असावी, त्याचाच भाग म्हणून मग पुढे तडजोड

करीत रहावे लागते, त्यातही जोडीदार एकमेकांच्या दोषासहीत सांभाळून घेण्याइतके समंजस असतील तर ठीक अन्यथा जड जाते. स्वत:बाबत बोलतांना सुनिताबाई म्हणतात -

"लग्न हे ज्या अर्थानं मला कृत्रिम बंधन वाटतं, त्याच अर्थानं घटस्फोट हे कृत्रिम स्वातंत्र्य वाटतं, आमचं नातं केवळ नवरा-बायकोचं नाही, ते अधिक गुंतागुंतीचं आहे आणि हा गुंता कोणत्याही कायदयात बसणारा किंवा जिवंतपणी सुटणारा नाही". हे बाईंचे विश्लेषण खरे तर अंतर्मुखतेतून आलेलं आणि संवेदनशील वाचकांना अंतर्मुख करायला लावणारे आहे.

आपल्या स्वभावाचे आणि माणसांच्या नातेसंबंधाचे विश्लेषण सुनिताबाईंनी खूप अंतर्मुख होवून तपशिलाने केले आहे, आणि एक अंतरीची ओढ स्पष्ट केली आहे, "मी दरिद्री असेन पण भिकारी निश्चित नाही, आपल्याला काय आवडेल, काय मिळाल्याने आनंद होईल, याचा मायेनं विचार करणारं, प्रसंगी आपली चूकही पदरात घेवून आपल्या बाजूनं उभं रहाणारं दुसरं कोणी आपल्याला असणं, यासारखी श्रीमंती नाही, प्रत्येकाला असा कुणीतरी "कैवारी बंधूराया" लाभला तर किती सुखी होईल ?" या शब्दात बाई आपल्या अंतरीची निरपेक्ष मैत्रभावाची ओढ व्यक्त करतात.

मी वनवासी - सिंधुताई सपकाळ - १९९०.

वनवासी हा शब्द दुहेरी अर्थाने लागू पडतो, एकतर वनात वास्तव्य करतो, त्याला वनवासी म्हणतात, किंवा ज्याला या जगाच्या पाठीवर कुणीही नाही, अशी व्यक्ती वनवासी समजावी,

पैकी संच एक धाटळी व्यक्तीमत्व म्हणजे सिंधुताई सपकाळ, वयाच्या दहाव्या-बाराव्या वर्षीच गळयामध्ये बांधलेलं विवाहाचं जोखड नियतीला मंजूर नव्हतं. म्हणूनच की काय ? उया-पु-या दहा वर्षातच सारी बंधने गळून पडली आणि वयाच्या बावीसाव्या वर्षीच ऐन तारूण्याच्या सीमारेषेवरच त्यांनी सा-या ऐहिक सुखाला तिलांजली दिली.

वाघाच्या बच्च्याला बोकडल्यानं दूधपाजलं, तरी वयात येताच त्याला आपल्या ख-या जातीची जाण व्हावी, तद्वत या वाघिणीनं आपला संसार सिमेंटच्या दलदलीतून चिखलद-याच्या जंगलात मांडला संसार हया शब्दांची जाणीव तिला नव्याने उमगली, हया "वाघिणीला" आता खरी जाणीव झाली, मी, माझी चूल व मूल, यापलीकडेही फार मोठा संसार आहे, हे तिला उमगलं, आणि जगानं लाथाडलेल्या माणूस म्हणून जगण्याचा अधिकार अव्हेरलेल्या आदिवासी बांधवांच्या सेवेचं व्रत तिने स्वत:हून अंगीकारलं, तिच्या चालण्या-

बोलण्यात अत्यंत नैसर्गिकपणा, ओघवती भाषा, बरंच कांही सोसलंय, भोगलंय हे जाणावून देणारी, सह्याद्रीच्या कडेकपारीची जातकुळी सांगणारी, रांगडी पण त्याचबरोबर मायेच्या ओलाव्यानं ओथंबलेली वाणी, आवाज भरदार पण करूणेची झालर असलेला, नऊवारी लुगडं, डोईवर पदर, पण त्यातही झपाटल्याचा आभास वेळोवेळी आपलं अस्तित्व दाखवतोय.

महाराष्ट्राच्या सीमारेषेवरील चिखलदरा नावाच्या डोंगरावळीत, काटयाकुटयात रक्ताळलेल्या अनवाणी पायाने फिरत आहे, शाळा, कॉलेज अथवा कुठल्याही सार्वजनिक सभेमध्ये आपल्या अलौकिक ओजस्वी वाणीनं दोन-दोन तास आपल्या आदिवासींच्या कर्मकथा सांगून त्या उपस्थितांच्या काळजाचा ताबा घेतात, अन् मिळेल ते पदरात पाडून त्यातून त्या चिखलदरा येथील प्रपंचात काडी-काडीची भर घालतात, जमवतात, उसवलेल्या आयुष्याला जोडू पहातात, ते ह्यातूनच, त्यांच्याच जीवनाची ही शब्दांकित गाथा.

बंध-अनुबंध : कमल पाध्ये

मुंबईतल्या रामवाडी राममंदिरातल्या विनायक भटजींची बाळबोध मुलगी आणि पुढे प्रभाकर पाध्ये या विचारवंत लेखकाची झालेली बायको कमल पाध्ये ही पुन्हा आत्मकथनाच्या निमित्ताने एकूणाच स्त्री-पुरुष नात्यातले "बंध-अनुबंध" शोधतात.

अगदी साठ-सत्तर वर्षांपूर्वीच्या मंदिराच्या सोज्वळ परिसरातही संस्कार संपन्न म्हणविणा-या, सुरक्षित चौकटीत रहाणा-या प्रतिष्ठीत घरातल्या अजाण कमळीला पुरुषी वासनांचे घृणास्पद अनुभव आले, आणि पुरुष सदैव स्त्रीकडे केवळ मादी म्हणूनच पाहतो, स्त्रीचे शरीर आपल्या उपभोगाचे हक्काचे साधन मानतो, हे कटू सत्य जाणवले.

नंतर प्रभाकर पाध्यांशी झालेला कमलाबाईंचा विवाह-प्रेमविवाह म्हणाण्यापेक्षा परिचयोत्तर विवाह म्हणाणे अधिक योग्य होईल, येथेही अननुभवी, तारुण्यात नुकतीच पदार्पण केलेली मुलगी आणि एक पुरेसा बाहेरच्या जगाचा अनुभव असलेला तरुण पुरुष एकत्र आले खरे पण पुन्हा सहजीवनामध्ये स्त्रीला जे घर हवेसे असते ते मात्र मिळाले नाही, ही खंत कमलताईंनी स्पष्ट केली आहे.

अशा अनेक उलटसुलट अनुभवातून जाताना कमलताईंही पुरुषप्रधान चौकटीत स्त्रीची जी घुसमट होते, तिचेही विश्लेषण करतात.

"मंगळसूत्र किंवा विवाहित स्त्रीच्या नावामागे लावलेलं सौ. ही स्त्रीच्या कनिष्ठपणाचं द्योतक मानायचं, त्या रक्षणाच्या ढाली मानायच्या हे श्रद्धेचं द्योतक मानायचं ? हा प्रश्नच आहे.

सा-या आयुष्याचा सारांश सांगतांना त्या म्हणतात, "म्हटलं तर समृद्ध, म्हटलं तर अपयशी असं हे माझं जीवन !" तरीही आपल्या विचाराबरचा अढळ विश्वास, वात्सल्य आणि स्नेह ठिकठिकाणी मिळाला याची कबुलीही त्यांनी मोकळेपणाने दिली आहे.

या तीन आत्मकथनांमधील स्त्री मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेच्या मूल्यांना नाकारणारी आहे, आयुष्यात एक मित्र असावा, अशी अपेक्षा बाळगणारी आहे आणि पती मित्र होवू शकत नाही, म्हणून खंतावणारी आहे.

## जगले जशी : लालन सारंग

मराठी रंगभूमी आपल्या अभिनयाने गाजवलेली, सखाराम, बाईंडर, कमला यासारख्या वादग्रस्त नाटकातही प्रमुख भूमिका केल्याने चर्चाविषयक झालेली अभिनेत्री लालन सारंग यांचे "जगले जशी" आयुष्यातील सगळे चढउतार बघून कोणाविषयी अढी, कटुता व बाळगता आणि आंधळी भक्ती न करता, आपल्या कलात्मक कारकीर्दीचे विश्लेषण करणारे एका

सुजाण व्यक्तीचे आत्मकथन आहे. सामान्यत: कलावंताचे आत्मकथन म्हणजे तपशीलाची जंत्री असते. एक कलावंत कसा घडत जातो ? याचा मागोवा सहसा घेतला जात नाही. हे केवळ "जगणे" नाही "जगण्याचे" जीवन करण्याचे सामर्थ्य असलेल्या कलावतीचा हा आत्मशोध आहे.

आपला कलावंत पती कमलाकर सारंग यांच्याबरोबरच नव्हे, प्रसंगी दोन पाउले पुढे राहून दोघांचे नाट्यजीवन आणि कुटुंब जीवनही कसे घडले हे स्पष्ट केले आहे.

तुलनेने या विधीपेक्षा एका दशकभराने पुढच्या पिढीत असलेल्या दोन स्त्रियांची आत्मकथने लक्षणीय आहेत. पैकी वरील एक सुप्रसिद्ध अभिनेत्री लालन सारंग यांचे, दुसरे अगदीच अप्रसिध्द -

"नरसाबाई" - मेधा किराणे.

दोघीही विवाहिता आहेत, तरीही त्यांची आत्मकथने पतीभोवती फिरत राहिली नाहीत. याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्या व्यवसायात त्या ठामपणे आपल्या स्वयंपूर्ण व्यक्तीपूर्ण व्यक्तीमत्वानिशी उभ्या आहेत. त्यांचे विश्व, त्यांचे जगणे पूर्णपणे त्यांचे आहे. दोघीही संवेदनशीलतेने स्त्री म्हणून आत्मशोध करु पाहणाऱ्या आहेत. विशेष

म्हणजे पूरेशा तटस्थपणे, प्रगल्भावस्थेत घेतलेला हा शोध आहे.

सुस्थितीतील मुलगी हट्टाने शालेय शिक्षण पूर्ण होताच नर्सिंगच्या कोर्ससाठी जाते आणि त्या व्यवसायात अनुभव संपन्न होते, स्वत:च स्वत:ला सापडत जाते, आपल्या व्यवसायातही बाईंच्या जातीचे दुर्दैवाचे दशावतार तिने सहृदयतेने टिपले आहेत, "पुरुषाचं मरण शेती अन बाईचं मरण विती" हे उघडपणे स्विकारणाऱ्या समाजातल्या स्त्रीच्या दुर्दैवाचे अनेक नमुने दिले आहेत, त्याचबरोबर ग्रामीण भागातल्या नर्सना जिणे नको करणारे गावगुंड, गावठी डॉक्टर यांचेही नमुने आहेत, त्या मानाने शहरातले डॉ. अधिक उमद्या प्रवृत्तीचे. शिक्षणासाठी आलेल्या मुलींच्या अडचणी समजून घेणारे। अशातच मेधा डॉक्टर किरणे यांच्याबरोबर विवाहबद्ध झाली, मग पतीच्या व्यवसायासाठी घर व्यवसाय अशी ओढाताण सोसणे आणि नोकरी सोडणे.

आणि तरीही डॉक्टरची पत्नी म्हणून प्रतिष्ठा मिरविण्या-पेक्षा कोणी "सिस्टर" म्हणून हाक मारली, की तिला आपली खरी ओळख पटते, एखादी ग्रामीण स्त्री "तुमचंच नांव माझ्या मुलीला ठेवलंय "नरसाबाय !" म्हणते, तेंव्हा तर धन्य-धन्य वाटते.

ओवी, गाणी, उखाणे, कोडी, अभंग या माध्यमातून आत्माविष्कार करत स्त्री हळूहळू आत्मचरित्र या वाङ्:मय प्रकारापर्यन्त पोचली, ही आत्मचरित्रे कमी असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान होय. पूर्वी समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन फार संकुचित होता, मुलीचा जन्म म्हणजे पूर्वजन्मीच्या पापाचे फळ अशी सर्व साधारण समजूत होती, या पारंपारिक समजुतीतून बाहेर यायला समाजाला दीर्घकाळ लागला, त्यामुळे स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाला समाजाने ब-याच उशिरा मान्यता दिली.

प्रारंभी स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले, स्त्री ही पुरूषाची पूरक एवढेच तिला समाजात स्थान होते, तिच्या मनाची दखल घ्यायला कुणी राजी नव्हते, व्यक्तीवादाच्या उदयानंतर तिचे मनोगत अनेक वाङ्:मयप्रकारांच्या आधारे पुरूष वर्गाकडूनच बोलते झालेले दिसते, स्त्रीला शिक्षण मिळू लागल्यावर तिला तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव झाल्यावर स्वत:च्या व्यथा-वेदनांना तिने कथा-कादंब-यांच्या माध्यमातून शब्दरूप दिले, सध:कोळात कोणताही वाङ्:मयप्रकार स्त्री-लेखनीत अपरिचित नाही.

आत्मचरित्र या वाङ्:मयप्रकाराच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास जनाबाईपासून आजपर्यन्त स्त्री-आत्मचरित्राकडे दृष्टीक्षेप

टाकल्यास, स्त्री आत्मचरित्रे प्रगतीपथावर आहेत, असे निश्चितपणे म्हणता येते, सर्वक्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने वाव मिळाल्याने स्त्रीचा दृष्टीकोन व्यापक होत आहे, याचे प्रतिबिंब आत्मचरित्रातही उमटलेले दिसते.

-x-x-x-x-

| क्र. नं. | पुस्तकाचे नांव | लेखक व प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| १] | "चरित्र आणि आत्मचरित्र" | डॉ. सदा क-हाडे, प्रथमावृत्ती, जुलै १९७६ [पृ. ५, १६, ८७, ८८] |
| २] | "आधुनिक मराठी वाङ्‌मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे" | डॉ. विमल भालेराव प्रथमावृत्ती १९८६. |
| ३] | "लोकप्रभा" | ७ एप्रिल १९९५. [ पृ. ४६, ४७ ] |
| ४] | प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास. | ल. रा. पांगारकर, खंड तिसरा शके १८६१. पृ. १२, १३. |

—x—x—x—